श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जून२०२५ | वर्ष – १३ अंक – ६ | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात 'डॉ. केतायुन अर्देशिर दिनशॉ हॉल'चा नामकरण समारंभ



*'डॉ. केतायुन अर्देशिर दिनशॉ हॉल'चे नामकरण करताना श्री. अशोकराव जोशी. सोबत (डावीकडून) डॉ. अनघा मोडक, डॉ. चंद्रशेखर, डॉ. यादव, श्री. बाळासाहेब काजरेकर, डॉ. विजय डोंबले, डीन डॉ. मानसिंगराव घाटगे आणि डॉ. सुवर्णा पाटील तसेच अद्यापक वर्ग*

दि. २८ मे २०२५ रोजी भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात एक लहानसा पण हृद्य सोहळा साजरा झाला. टाटा मेमोरिअल सेंटरच्या माजी संचालिका डॉ. केतायुन अर्देशिर दिनशॉ यांचे नाव महाविद्यालयातील एका लेक्चर हॉलला देण्यात आले. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट या संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी यांच्या शुभहस्ते नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्या वेळी संस्थेचे विश्वस्त श्री. बाळासाहेब काजरेकर, महाविद्यालयाचे डीन डॉ. मानसिंगराव घाटगे, माजी डीन डॉ. विजय डोंबले, मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, अद्यापकवर्ग, वैद्यकीय विद्यार्थी, कर्मचारीवर्ग आणि संस्थेशी निगडीत अनेक लोक उपस्थित होते.

नामफलकाचे अनावरण झाल्यावर त्याच हॉलमध्ये एक समारंभ आयोजित केलेला होता. श्री. अशोकराव जोशी, डॉ. घाटगे, डॉ. विजय डोंबल, डॉ. विलास देशमुख, डॉ. सुवर्णा पाटील आदींनी दीप प्रज्वलन केल्यावर डॉ. मिहिर बैरट यानी गणेशस्तुतिपर गीत सादर केले. आणि त्यानंतर डॉ. सुवर्णा पाटील यांनी या समारंभामागची भूमिका आणि डॉ. दिनशॉ आणि डेरवण रुग्णालय तसेच वैद्यकीय महाविद्यालय यांच्यातील ऋणानुबंधांविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, ''..जेव्हा आपण एखादं लेक्चर देत असतो तेव्हा आपला उद्देश असतो की विद्यार्थ्यांनी पूर्णपणे लक्ष केंद्रित करून त्या अध्यापकांकडे पाहावं आणि त्यांचे लक्ष एकाग्र होण्यासाठी ऑडिओ व्हिज्युअलची उत्तम सोय असावी, म्हणून श्री काकामहाराजांनी आणि वालावलकरसाहेब यांनी या हॉलचे त्या दृष्टीने



*डॉ. केतायुन अर्देशिर दिनशॉ*

नूतनीकरण करून घेतले. या हॉलला डॉ. दिनशॉ मॅडमचे नाव का देण्यात आले आहे याची अनेक जणांना विद्यार्थी आणि अध्यापकांनाही कल्पना नसेल. त्या विषयीच मी आता बोलणार आहे.

डॉ. दिनशॉ या टाटा मेमोरिअल सेंटरच्या तत्कालीन डायरेक्टर! टाटा मेमोरिअल सेंटर आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालयामध्ये कोकणातील कॅन्सर निर्मूलनाच्या संयुक्त मोहिमेचा शुभारंभ झाला त्या मोहिमेच्या त्या शिल्पकार होत्या.

डॉ. केतायुन दिनशॉ यांचा जन्म १९४३ साली झाला आणि खरंतर त्या काळी आधी स्त्रीने डॉक्टर होणं खूप विशेष होतं आणि त्यात त्यांनी रेडिओथेरपीमध्ये पदवी घेतली. ती तर नुकतीच ऊर्जितावस्थेत येत असलेली शाखा होती कारण त्या वेळी कॅन्सरचं प्रमाण आहे एवढं नव्हतं आणि तरीसुद्धा त्यांनी इंग्लंडला जाऊन केंब्रिजमधून १९७० साली ह्या डिग्रीसाठी आपला शिक्षण सुरू केलं केलं. त्यानंतर फेलोशिप इन रॉयल कॉलेज ऑफ रेडिओलॉजिस्ट ही उच्च पदवी संपादन केली आणि डिप्लोमा इन रेडिएशन थेरपी संपादन करून साउथ ईस्ट एशियामध्ये जे सर्वात मोठं कॅन्सरचं हॉस्पिटल आहे तेथे म्हणजे टाटा मेमोरियल सेंटरमध्ये १९७४ साली प्रोफेसर म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर डिपार्टमेंट हेड म्हणून १९७५मध्ये काम पहिलं. त्यानंतर त्या टाटा मेमोरियल सेंटरच्या डायरेक्टर झाल्या. डिपार्टमेंट ऑफ अ‍ॅटोमिक एनर्जीमध्येही त्यांनी पदे भूषवली.

एवढी पदे भूषवल्यानंतर त्यांच्या विचारांच्या कक्षा, दूरदृष्टी ही एवढी वाढत गेली. त्यांनी विचार केला की कॅन्सरचं प्रमाण भविष्यात वाढणार आहे. रेडिएशनची गरज भासणार आहे आणि हे फक्त टाटा मेमोरियलपर्यंत मर्यादित राहणार नाही आणि तसं मर्यादित राहूनही चालणार नाही आणि म्हणून त्यांनी डॉक्टर शास्त्री आणि डॉक्टर बाणावली यांना विचारले की टाटा मेमोरियलचं केंद्र कोठे सुरू करता येईल की जिथे कॅन्सरची ट्रीटमेंट देता येईल आणि हा जो टाटा मेमोरियलवर येणारा रुग्णांचा लोंढा आहे तो कमी होईल. डॉ. बाणावलींनी आपल्या संस्थेचे नाव सुचविले. डॉ. दिनशॉ यांची एक अशी अट होती की ती संस्था राजकीय विचारधारेशी संलग्न असू नये.

ते सगळंच डेरवणमध्ये जुळून आलं आणि डॉक्टर शास्त्री स्वतः येथे आले. त्यांनी आणि बाणावलीसर यांनी संस्थेबद्दल एक सादरीकरण टाटा मेमोरियलला दिनशॉ मॅडमसमोर दिलं. ते दिल्यानंतर त्यांनी तत्क्षणी ठरवलं की डेरवणला यायचं आणि टाटाचे आऊट रिच सेंटर सुरू करायचं आणि त्याच दिवशी त्यांनी डेरवणची भेट ठरवली आणि त्या डेरवणला आल्या, आणि हॉस्पिटलशी टाटा मेमोरिअलचा करार हा २००३ साली झाला. त्यानंतर त्यांनी अनेक वेळा आपल्या इन्स्टिट्यूटला भेट दिली आहे. दरवेळी वेगवेगळ्या गावातसुद्धा त्या सहभागी झाल्या आहेत. मुख्य म्हणजे ब्रॅकी थेरेपी भारतात आणण्यामध्ये त्यांचं खूप मोठं योगदान आहे.

त्यामध्ये ज्या मॉडर्न रेडिएशन टेक्निक्स आहेत, आय.एम.आर.टी., आय.जी.आर.टी., डी.सी.आर.टी. ही सगळी टेक्निक्स त्यांनी भारतामध्ये आणली जेणेकरून कॅन्सरला सर्वसमावेशक ट्रीटमेंट मिळावी आणि रेडिएशनचा उपयोग करून पेशंटला जीवदान मिळावं यासाठी प्रयत्न केला आणि 'अक्ट्रॅक्ट' हे टाटाचे एक सेंटर आहे; ते उभारण्यामागे मॅडमचा मोठा हात आहे.

दुसरं म्हणजे आपल्याकडे रेडिएशन मशीन असावं यासाठीसुद्धा श्री. अनिल काकोडकरसाहेबांबरोबर त्यांनी चर्चा केली. डेरवणसारख्या खेड्यात इतक्या दूरदृष्टीने मॅडमनी 'आऊट रिच सेंटर' सुरू केलं आणि 'मॉडेल कॅन्सर कंट्रोल प्रोग्राम' तयार करायला सांगितला. या मागचा विचार असा की पेशंटला कॅन्सर झाला तर तो पैशाअभावी हॉस्पिटलला येणार नाही, आपल्यालाच त्याच्या घरी जाऊन त्याला शोधावं लागेल, मग त्याच्यावर उपचार पद्धती कोणती ते ठरवावे लागेल, त्यासाठी मॉडेल कॅन्सर प्रोग्राम सुरू केला आणि रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जवळपास पंचवीस लाख इतकी लोकसंख्या आहे त्यामधून २५ ते ६५ वयोगटातल्या सगळ्या लोकांची घरोघरी जाऊन तपासणी करायची आणि कॅन्सर आहे का बघायचं! तीन कॅन्सर त्यांनी निवडले, तोंडाचा, गर्भाशय मुखाचा आणि स्तनाचा. सर्वेक्षणासाठी दहा 'टेम्पो ट्रॅव्हलर' गाड्या घेतल्या, १०० कर्मचारी नियुक्त केले, प्रत्येक गाडीत दहा अशी विभागणी केली आणि त्यांना कॅन्सर शोधण्यासाठी प्रशिक्षित केले. ह्या शंभर लोकांनी ट्रेनिंग पूर्ण केले आणि त्यानंतर गावागावात जाऊन २५ ते ६५ वयोगटात कॅन्सर तपासणी सुरू झाली आणि 'मॉडेल कॅन्सर प्रोग्राम' म्हणून तो आता संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे.

'कर्करोगावर प्रतिबंधात्मक उपाय' असाही नवीन कार्यक्रम



*डावीकडून : डॉ. प्रशांत मुल्या, डॉ. विलास देशमुख, डॉ. अनघा मोडक, डॉ. चंद्रशेखर, डॉ. यादव, डॉ. विजय डोंबले, डॉ. मानसिंगराव घाटगे, बाळासाहेब काजरेकर, श्री अशोकराव जोशी, डॉ. नेताजी पाटील, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अय्यर, शरयू यशवंतराव, लक्ष्मीकांत महाजन आणि श्रीकांत पराडकर*

सुरू झाला. टाटा मेमोरियलमध्ये त्या वेळेस त्यांनी 'प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी' विभाग प्रस्थापित केला. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपणही गतवर्षी 'प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी डिपार्टमेंट' सुरू केले आहे. डॉक्टर वेल्हाळ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग सध्या चालू आहे आणि एवढं करून त्या थांबल्या नाहीत. तर इथे पेशंटना कॅन्सर तज्ज्ञांशी बोलता आलं पाहिजे; म्हणून त्यांनी इस्रोला सांगून सॅटेलाइटतर्फे टेलीमेडिसिन सुरू केलं. त्याद्वारे त्या काळी रुग्ण आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधील तज्ज्ञ यांच्यात संवाद साधता येत होता आणि ते प्रत्यक्ष रुग्णाला पाहून उपचार सुचवू शकत होते. याशिवाय दर महिन्यातून एकदा टाटा मेमोरियलचे डॉक्टर्स येऊन मेडिकल ऑन्कॉलॉजी आणि सर्जिकल ऑन्कॉलॉजी उपचार करायचे. त्यानंतर मग बाणावलीसर आणि दिनशॉ मॅडम यांनी न्युक्लिअर शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकरांना डेरवणला पाचारण केले. त्या वेळी डॉ. काकोडकर हे 'डिपार्टमेंट ऑफ अ‍ॅटॉमिक एनर्जी'चे चेअरमन होते, ते स्वतः इथे २००६ साली आले आणि त्यांनी बघितलं की रेडिओथेरपीची सोय इथे नाही. डॉ. काकोडकर आणि डॉ. बाणावली यांच्या चर्चेतून असं ठरलं की आपण येथे रेडिएशनची पण सुविधा उपलब्ध करून द्यायची आणि त्यासाठी त्यांनी आपल्याला पाच कोटींची ग्रँट मिळून दिली. हा सगळा व्यवहार अतिशय पारदर्शकरीत्या पार पडला. आणि त्या ग्रँटमधून ३० लाख उरले आणि तो चेक आपण पुन्हा काकोडकर सरांकडे परत द्यायला गेलो तर काकोडकरसरांनी आश्चर्य व्यक्त केलं की असं आजपर्यंत कुठल्या संस्थेने असे उरलेले पैसे परत केलेले नाहीत. तुमची पहिली संस्था अशी आहे. तर तुम्ही हे पैसे परत न देता कुठल्यातरी चांगल्या कामाकरता वापरा असं त्यांनी आम्हाला सांगितलं.

२००१ सालापासून रक्तपेढी सुरू होती पण 'कंपोनंट लॅब' त्या वेळी आपल्याकडे नव्हती. प्लेटलेट्स, प्लाझ्मा हे किमोथेरपीच्या पेशंटला आवश्यक असतात म्हणून आपण 'कंपोनंट लॅब' सुरू करायचा विचार केला आणि त्यात काही आणखीन पैसे घालून २००८ साली कंपोनंट लॅब उभी केली.

कंपोनंट लॅब केल्यावर आम्हाला प्रश्न पडला होता की याचा उपयोग नक्की होईल ना? कॅन्सर व्यतिरिक्त कोणत्या पेशंटना हे घटक वापरात येतील? हा प्रश्नच होता. पण योगायोग म्हणा किंवा काळाची गरज म्हणा २००९ साली लेप्टो स्पायरोसिसने शेतकरी आजारी पडू लागले आणि आपण इथेच त्यांना प्लेटलेट देऊ शकलो त्यामुळे असंख्य रुग्णाचे प्राण वाचले.

डॉ. बाणावली इथे 'मेट्रोनॉमिक किमोथेरपी'ची प्रॅक्टिस करत होते पण त्यांना टाटामध्ये या किमोथेरपीची प्रॅक्टिस करण्याची परवानगी नव्हती. येथे डॉ. बाणावलींनी काकोडकरसरांना मेट्रोनॉमिक किमोथेरपीवर प्रेझेंटेशन दिलं आणि ती कशी पेशंटना हितकर आणि स्वस्त आहे हे सांगितलं. ते काकोडकरसरांना इतकं पटलं की दुसऱ्या दिवशी दिनशॉ मॅडमबरोबर त्यांनी मिटींग अरेंज केली आणि ही थेरपी टाटामध्येसुद्धा वापरावी यासाठी सगळे प्रयत्न काकोडकरसाहेबांनी चालू केले आणि आता तुम्हाला माहिती आहे की मेट्रोनॉमिक किमोथेरपीची जगप्रसिद्ध झाली आहे. आता सगळे जण हीच थेरपी वापरतात.

इतकं होऊन दिनशॉ मॅडम थांबल्या नाहीत. त्यांनी नॅशनल आणि इंटरनॅशनल स्तरावर बरेच प्रोग्राम घेतले. साऊथ ईस्ट एशियाची जी रिजनल कॅन्सर सेंटर आहेत त्या सगळ्यांचे प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी सेशन त्यांनी आपल्या येथे डेरवणला अरेंज केलं, नायजेरिया, साऊथ आफ्रिका इथून सगळीकडून शास्त्रज्ञ आले होते. WHOमधूनसुद्धा अधिकारी आले व अगदी दुर्गम अशा कणकवली तालुक्यातील गावांमध्ये भेटी दिल्या. अशा प्रकारे आपली संस्था कॅन्सर सेंटर म्हणून नावारूपाला येऊ लागली.

डेरवणचं काम पाहून कॅन्सर रजिस्ट्रीची सुरुवात करण्यात आली. रजिस्ट्री याचा अर्थ काय तर कॅन्सरचं सर्व्हेलन्स करून कुठल्या प्रकाचे कर्करोग जास्त आढळतात हे पाहणे आणि पॉलिसी ठरवणे. पॉलिसी ठरवायची असेल तर तुम्हाला त्याचं प्रमाण किती आहे हे माहिती असणं आवश्यक असतं. त्याचा प्रिव्हेलन्स किती आहे हे माहिती असणं गरजेचं असतं. हे शोधण्यासाठी त्यांनी पॉप्युलेशन बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री सुरू केली. आपण रत्नागिरी जिल्हा, सिंधुदुर्ग जिल्हा पॉप्युलेशन बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री २००८ साली आणि हॉस्पिटल बेस कॅन्सर रजिस्ट्री २०२० साली सुरू केली.

ज्या वेळी आपण कॅन्सर स्क्रीनिंग सुरू केलं त्या वेळी कॉल्पोस्कोपी आणि VI- VILI प्रशिक्षणासाठी डॉ. दिनशॉनी एक कार्यक्रम आयोजित केला आणि त्याकरिता त्यांनी अमेरिकेहून ऑन्कोलॉजिस्ट डॉ. शंकर यांना बोलवले होते, ते स्वतः डेरवणला आले होते आणि त्यांनी कॉल्पोस्कोपी ट्रेनिंग दिलं होतं. हे सगळं स्वप्न वाटत होतं की गावात जाऊन खेड्यातली बाई कॉल्पोस्कोपीला (गर्भाशय मुखाचा कॅन्सर) तयार होईल; पण हे सगळं त्यांनी करून

दाखवलं. आज आपल्या संस्थेचे खूप मोठे योगदान आहे कारण सर्व फील्ड स्टाफने हे सगळं काम व्यवस्थित केलं आणि संस्थाचालकांनीही पूर्णपणे योगदान दिल्यामुळे हे घडू शकलं. त्यामुळे मग न्युक्लियर कॉर्पोरेशनने पुढाकार घेतला. इथे डॉर्मेटरी युनिट स्थापन झालं. डॉक्टर एस. के. जैन हे न्युक्लियर कॉर्पोरेशनचे तत्कालीन चेअरमन होते.

महत्त्वाचा मुद्दा असा आहे की एका महिला रेडिओथेरपिस्ट महिला डॉक्टरच्या दूरदृष्टीमुळे सर्वसमावेशक कॅन्सर निदान आणि उपचार केंद्र एकाच छताखाली गोरगरिबांना सेवा देऊ शकत आहे. संस्थेचे व्हिजन एवढं मोठं आहे हे त्या वेळी कोणाच्याही लक्षात आलं नसेल की इथे मेडिकल कॉलेज होणार आहे आणि मेडिकल कॉलेजमधल्या मुलांना हे जर नव्याने वाढणारे आजार, ज्याचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर उद्रेक होणार आहे उदाहरणार्थ कॅन्सर, डायबिटीस, यांचा उद्रेक झाला आहे आणि त्याकरता डॉक्टर निर्माण करणे गरजेचे आहे आणि ह्या डॉक्टरांना कॅन्सरबद्दल जागृती आणि उपचारांचे ज्ञान मिळणे गरजेचे आहे ते आपण होऊनच इथे घडून आले.

भारतात क्वचितच वैद्यकीय महाविद्यालयात कॉम्प्रेहेन्सिव्ह कॅन्सर ट्रीटमेंट सध्या उपलब्ध आहे; जिथे रेडिएशन फॅसिलिटी, ब्रॅकी थेरपी, पेट स्कॅन, स्पेक्ट स्कॅनसारखे उपचार होतात. हे सर्व टाटा मेमोरियलमध्ये आहे. पण ते MBBS मेडिकल कॉलेज नसून फक्त पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट आहे म्हणून एमबीबीएस शिकतानाच इथल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होत आहे. उत्तीर्ण झालेल्या काही विद्यार्थ्यांना कॅन्सर निगडित न्युक्लिअर मेडिसिन, रेडिएशन ऑन्कॉलॉजी अशा शाखांमध्ये उच्च शिक्षणाची संधी मिळाली आहे. एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला ह्या नवीन शाखांबद्दल माहिती असणं आणि त्यांनी त्यात रस दाखवणं हे विशेष आहे. एम.डी., एम.एस. विद्यार्थ्यांना ऑन्कॉलॉजी, सर्जिकल ऑन्कॉलॉजीमध्ये प्रशिक्षण मिळत आहे आणि अशा प्रकारे संस्थेची प्रगती होत आहे ती टाटाच्या संलग्नतेमुळे आणि त्यांच्या सततच्या टेक्निकल सपोर्टमुळे. डॉ. दिनशॉ या व्हिजनरी डॉक्टर आपल्या सांनिध्यात आल्या त्यामुळे हे सगळं होत आहे आणि संपूर्ण भारतभर आता आपल्या संस्थेचे नाव होत आहे. आपण जे काम करतोय त्याची दखल घेतली जात आहे. ह्या वर्षी 'नेक्स्ट जेन्स सिक्वेन्स मशीन'सुद्धा स्थापित झाले आहे . त्यामुळे जेनेटिकचा अभ्यास आणि संशोधन शक्य होत आहे.

टाटा मेमोरियलमधील शास्त्रज्ञ डॉक्टर रिटा मुल्हेरकर आणि डॉक्टर नीलम शिरसाट यांनीही आपल्याकडे सुरू असलेल्या संशोधनात रस दाखवून प्रयोगशाळा स्थापन केल्या आहे. आपल्याकडील पॅथॉलॉजी लॅब उत्कृष्ट असावी असा दिनशॉ मॅडमचा आणि डॉक्टर बाणावलींचा आग्रह होता आणि म्हणूनच डॉक्टर संगीता देसाईंसारखे बरेच डॉक्टर्स आपल्याकडे येत होते आणि आता ही धुरा डॉक्टर डोंबलेनी सांभाळली आहे आणि गरजेप्रमाणे टाटामधील डॉक्टरांशी संपर्क साधला जात आहे.

डॉक्टर दिनशॉ यांच्या स्वप्नाप्रमाणे त्यांनी २० आऊटरिच सेंटर निश्चित केली होती, त्यातले आपलं केंद्र हे सगळ्यात वरच्या क्रमांकाचे केंद्र आहे आणि प्रगती पथावर आहे. डॉक्टर दिनशॉंचेच स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी आपल्या संस्थेने म्हणजेच स्वतः श्री काकामहाराज, बाणावलीसर आणि वालावलकरसाहेब यांनी खूप मोठा सिंहाचा वाटा उचलला आहे. कॅन्सर सेंटर निर्माण व्हावे हे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगले आणि ज्यांच्या प्रयत्नांमुळे हे सगळं घडू शकलं त्या डॉ. दिनशॉ यांच्या स्मृती सतत जागृत राहाव्यात आणि एवढ्या मोठ्या व्हिजनरी डॉक्टरची आठवण आपल्याला सतत राहावी, त्यांच्याकडून सतत प्रेरणा घ्यावी याकरिताच या हॉलला त्यांचं नाव देण्याचं श्री काकामहाराजांनी सुचवलं आणि आम्हालाही वाटते की ते अत्यंत सयुक्तिक आहे. डॉ. दिनशॉ यांनी दाखविलेल्या मार्गावर आपण पुढे चालणार आहोत!

*'डॉ. केतायुन अर्देशिर दिनशॉ हॉल'मध्ये त्यांच्या जीवनकार्याविषयी बोलताना डॉ. सुवर्णा पाटील*



# श्रीबाबामहाराज समाधिमंदिरात एकावन्नाव्या घनपारायणाचा शुभारंभ



*वे.मू. श्रीकांत भिकाजी चितळे दीपप्रज्वलन करताना, सोबत वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी, वे.मू. माधव परांजपे, पाठशाळेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर,*

मिती ज्येष्ठ शु।। द्वादशी, शक १९४७; रविवार, दि. ८ जून २०२५ रोजी श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात सकाळी ठीक आठ वाजता, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेचे छात्र वे.मू. मंदार मधुकर क्षीरसागर यांनी मुखोद्गत वेदपारायणाला प्रारंभ केला. या वेळी समारंभाचे अध्यक्ष वे.मू. श्रीकांत भिकाजी चितळे, पारायणाचे श्रवणकर्ते वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी, पाठशाळेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर, पाठशाळेचे प्राचार्य वे.मू. मंदार फडके आणि वे.मू. माधव परांजपे, संस्थेचे अध्यक्ष श्री. यशवंत तथा बापुसाहेब इनामदार, वे.मू. प्रसाद निगुडकर, भ.क.ल.वालावलकर रुग्णालय डेरवणच्या आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, पुण्यनगरीतील ब्रह्मवृंद तसेच वेदाभ्यासक विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने भक्तगणही उपस्थित होते.

श्रीसद्गुरू बाबामहाराज आणि श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती तथा श्रीमहाराज यांना वे.मू. मंदार क्षीरसागर यांनी माल्यार्पण करून सद्गुरूंचे आशीर्वाद घेतले आणि वे.मू. चितळेगुरुजी, वे.मू. बोरकरगुरुजी, श्री. अशोकराव जोशी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. वे.मू. प्रथमेश पुरोहित आणि वे.मू. पुरुषोत्तम वझे यांनी ईशस्तवन केले.

सूत्रसंचालक निगुडकरगुरुजी यांनी समारंभाचे अध्यक्ष वे.मू. श्रीकांत भिकाजी चितळेगुरुजी यांचा परिचय करून दिला. ‘चितळेगुरुजी यांनी वेदाचार्य विनायकभट्ट घैसास यांच्याकडे दशग्रंथांसह क्रमान्त अध्ययन केल्यावर ‘उमाश्रुति’ वेदशाळेत स्वत:च्या घरी आपल्या जबाबदारीवर पन्नास विद्यार्थ्यांना याज्ञिकीचे शिक्षण दिले. एकाच वेळी अनेक व्रते अंगीकारून त्यांचे काटेकोर पालन करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ते दत्तभक्त आहेत त्यामुळे दररोज गुरुचरित्राचे पारायण हा त्यांचा नेम आहे. बालपणापासून नियमित व्यायाम, नियमबद्ध आहारविहार, अतिशय नेमस्त आणि व्रतस्थ असे हे व्यक्तिमत्त्व आहे. गुरुचरित्रावर त्यांनी अनेक प्रवचने दिली आहेत. धार्मिक मासिकात ते विविध विषयांवर लेखन करतात. त्यांनी आपल्या गुरूंच्या अमृतमहोत्सवानिमित्त ‘गुरुगृही’ हे पुस्तक लिहिले आहे. तसेच ‘१६ संस्कारां’वर लिहिलेल्या त्यांच्या पुस्तकाच्या १० वर्षात ९ आवृत्त्या निघाल्या आहेत. अत्यंत बहुआयामी असे हे व्यक्तित्व आहे.’ श्रीकाकांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या नंतर वे.मू. माधव परांजपेगुरुजी यांनी वे.मू. बोरकरगुरुजी, श्रीकाकामहाराज, श्री. विकासराव वालावलकर, श्री. बापुसाहेब इनामदार, डॉ. सुवर्णा पाटील आदींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सूत्रसंचालक वे.मू. निगुडकरगुरुजी आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले,‘‘मी श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती वेदपाठशाळा



वे.मू. प्रसाद निगुडकर - सूत्रसंचालन



श्री. अशोकराव जोशी दीपप्रज्वलन करताना

व आजपासून आरंभ होणाऱ्या घन पारायणाविषयी थोडक्यात मनोगत व्यक्त करतो. ''न घडो कवणाचा मत्सर धर्म श्रद्धा वाढो फार। वेद विहीत मार्गाचा आचार करवी सद्गुरु मज करवी।।'' या सद्गुरू महाराजांनी केलेल्या वरयाचनेनुसार श्रीसद्गुरू बाबांकडे याचना करताना त्यात उद्धृत केलेल्या पंक्तीनुसार बाबांनी तसा वर दिल्यामुळेच श्रीमहाराजांची धर्मावरील निष्ठा अधिक दृढ झाली. त्यानुसार सनातन वैदिक आर्यधर्माचा ज्वलंत अभिमान श्री महाराजांना होता. त्यानुसार ते म्हणत की एके काळी जसे सगळ्या जगाचे गुरुपद आपल्या देशाकडे होते तसे ते पुन्हा प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर या देशात सनातन वैदिक आर्यधर्माचे स्थान उच्च असायला हवे. हिंदुस्थानाला जगद्गुरुपद प्राप्त व्हावे अशी त्यांची तळमळ होती. म्हणूनच सर्वत्र वैदिक धर्माची पताका फडकावी त्याकरिता श्रीमहाराजांनी वेदमूर्ती ऋग्वेदसम्राट किंजवडेकरगुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली वेदाध्ययन केंद्र चालविले. वेदाध्ययन करणाऱ्यांविषयी त्यांच्या मनात आदरभाव होता. केवळ वेद मुखोद्गत आहेत म्हणून ते विद्वानांसमोर नतमस्तक होत. श्रीमहाराज वैदिक व शास्त्री मंडळींना अत्यंत सन्मानाची वागणूक देत. या महाराजांच्या भूमिकेमुळे महाराजांनी सुरू केलेल्या पाठशाळारूपी वेदवृक्षाच्या शाखा अधिक मजबूत होऊन त्याला फळं यायला सुरुवात झाली आहे. त्याचेच फळ म्हणजे आजचे सुरू होणारे घनपारायण.

घनपारायण सोहळा अनुभवत असताना सर्वांना अत्यंतिक प्रसन्नता वाटते परंतु त्यामागे वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची बारा वर्षांची तपश्चर्या पणाला लागते. मंत्रसाधना हे एक मोठे अवघड प्रकरण आहे. त्यासाठी दीर्घकाल साधना करावी लागते. साधना करणाऱ्याचे शरीर व मन साधना करण्यास योग्य असावे लागते. साधनेत काटेकोरपणा आणि सातत्य याला फार मोठे महत्त्व आहे. यासाठी दीर्घकाल वाट पाहावी लागते. जशी विद्यार्थ्यांना आपले ज्ञान ताऊन सुलाखून प्रकट करावे लागते त्यापेक्षा गुरूंना आपली पूर्ण साधना फलित होण्यासाठीही दीर्घकाल थांबावे लागते. तेव्हाच आजसारखा दिवस उगवतो. या सर्वांच्या श्रेयाच्या भागीदारीत अनेक दृश्य अदृश्य महान शक्ती असतात हे विसरून चालणार नाही. वेदमूर्ती परांजपेगुरुजींनी यासाठी अधिक कष्ट घेतलेले आहेत किंजवडेकर गुरुजींनंतर आपल्या वेदपाठशाळेची धुरा समर्थपणे सांभाळीत त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. याचीच प्रचिती आपल्याला मागच्या वे.मू. मनोजगुरुजींच्या घनपरायणातून आलीच आहे. त्यानंतर यात सिंहाचा वाटा असणारे श्रीकाकामहाराज यांना विसरून चालणार नाही कारण सद्गुरू श्रीमहाराजांनी सुरू केलेले वेदअध्ययन केंद्र मोठ्या स्वरूपात सुरू ठेवण्याचे शिवधनुष्य त्यांनी तेवढ्याच क्षमतेने पेलले आहे.

समर्थ रामदासस्वामींचे सत्‌शिष्याचे लक्षण तंतोतंत श्रीकाकांच्या बाबतीत लागू पडते. 'मुख्य सत्‌शिष्याचे लक्षण। सद्गुरु वचनी विश्वास पूर्ण। अनन्य भावे शरण। त्याचे नाव सत्‌शिष्य।।' सद्गुरूंच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवत अनन्य भावाने शरण जाऊन महाराजांनी जे ईश्वरी कार्य श्रीकाकांवर सोपवले ते भव्य दिव्य स्वरूपात आज बाबांच्या वैभवात वाढवताना ते इथे दिसत आहे. त्याला आपण साक्षी आहोत. आजपर्यंत संस्थेने पन्नास घनपारायणं आयोजित केली. हे करणं ही सामान्य गोष्ट नाही. आजचे हे घनपारायण एकावन्नावे आहे आणि या पारायणाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रह्मपूज्य बाबांच्या नूतन राजदरबारात हे घडत आहे. हा दुग्धशर्करा योगच आहे. वे.मू. मनोज जोगळेकरगुरुजींच्या मुखोद्गत घनपारायणानंतर वे.मू. मंदार क्षीरसागर यांच्या पारायणाला आजपासून प्रारंभ होत आहे. सद्गुरूंच्या कृपेने पारायण साध्य होईल यात तिळमात्र मात्र शंका नाही. त्याकरिता सद्गुरू बाबांच्या चरणी प्रार्थना करू या की 'स्वाध्यायाने उमजावी मज माझ्यातील शक्ती। उरते अमृत भक्ती। अनंत जन्मासाठी तुज ही शरणागती। तुज ही शरणागती ।।''

यानंतर डॉ. सुवर्णा पाटील यांनी संस्थेच्या नव्याने सुरू होणाऱ्या विद्यापीठाविषयी माहिती दिली. त्या म्हणाल्या, ''१९७७ सालापासून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि श्री सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही ट्रस्टनी समाजउत्थानाचं काम केलं आहे आणि त्या संस्कृती जतनासाठी संस्कृती संवर्धन म्हणून शिवसृष्टी आणि अनेक गोष्टी इथे निर्माण केल्या. जलसंवर्धनासाठी



श्री. विकासराव वालावलकर दीपप्रज्वलन करताना



वे.मू. पुरुषोत्तम वझे आणि वे.मू. प्रथमेश पुरोहित – ईशस्तवन

पाटबंधारे, धरणं बांधणं, शेती करणं अशा प्रकारे जलसंवर्धन केलं व श्रीमहाराजांनी गोसंवर्धनासाठी गोशाळा सुरू केल्या. त्यानंतर कृषी संवर्धन आणि पारंपरिकरीत्या शेती व्हावी यासाठी पारंपरिक शेती कुठलीही खतं न वापरता सुरुवात केली. शरीर सौष्ठव आणि आरोग्य आणि मानसिक आरोग्य चांगलं राहावं म्हणून क्रीडासंकुल सुरू केलं आणि चांगलं आरोग्य आणि आरोग्य संवर्धन राहावं म्हणून सर्व आरोग्याच्या शिक्षणाच्या सोयी आणि हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजही सुरू केलं. पण त्या सर्वात महत्त्वाची गोष्ट जी महाराजांनी केली ती १९८३ साली किंजवडेकरगुरुजींनी जी वेदपाठशाळा सुरू केली होती त्या शाळेचं जतन आणि संवर्धन व्हावं आणि त्यायोगे वेदांचं जतन व्हावं यासाठी त्या शाळेला निधी उपलब्ध करून दिला आणि म्हणून आज २०२५ सालापर्यंत इथे वेद व्यवस्थितरीत्या आपण जतन करू शकलो. कारण आपला पूर्ण सनातन धर्म त्या वेदांच्या चार खांबांवर उभा आहे असं आपण म्हणू शकतो आणि तीच कास धरून जसं आपण म्हणतो की सद्गुरूंनी स्वप्न पाहिलं किंवा ते संकल्प करतात तो सिद्धी असाच असतो आणि त्या संकल्पाची सिद्धी होताना आज आपल्याला दिसली आहे. कारण काकामहाराजांनी आपल्या सद्गुरूंच्या संकल्पाची सिद्धी व्हावी यासाठी अथक प्रयत्न केले आहेत.

आणि म्हणूनच आपण 'श्री विठ्ठलराव जोशी विद्यापीठ' या नावाने एका वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठाची स्थापना करणार आहोत. आणि त्या विद्यापीठाची वैशिष्ट्ये अशी असणार आहेत की ज्यामध्ये वेदपाठशाळेचे शिक्षण, क्रीडासंकुल म्हणजे स्पोर्ट्सबद्दलचे शिक्षण, आयुर्वेद-योग-आहाराचं शिक्षण, वैद्यकीय विज्ञानाचे शिक्षण, पॅरामेडिकल शिक्षण, कृषीबद्दलचे सर्व कोर्सेस आणि त्याचे शिक्षण आणि वेगवेगळ्या अशा प्रकारचे अभ्यासक्रम एकाच छताखाली एका विद्यापीठात उपलब्ध झाल्यामुळे वेदाच्या विद्यार्थ्यांना योगासन, आहार, वैद्यकीय वेगवेगळी माहिती; वेगवेगळ्या भाषा संस्कृत असेल, स्पॅनिश असेल, जर्मन असेल या भाषांबद्दल माहिती, संगणकाची माहिती मिळणार आहे आणि त्याचबरोबर वैद्यकीय, पॅरामेडिकल इतर शाखांच्या विद्यार्थ्यांना वेदांबद्दलचं ज्ञान मिळणार आहे. आज सामान्य माणसांना 'वेद' म्हटलं की ते म्हणतात की आम्हाला काही नाही माहीत. ऐकलंय आम्ही फक्त ! नावं फक्त घरांची आणि इमारतींची 'वेद' ठेवतात. पण प्रत्यक्ष वेदात काय आहे, त्यात किती ऋचा आहेत, ऋचा म्हणजे काय, वेद म्हणजे काय; अगदी सुई दोऱ्यापासून नक्षीकाम ते कुटुंब व्यवस्था ते अगदी खगोलशास्त्रीय म्हणजे चंद्र सूर्य तारे कसे फिरतात; म्हणजे गॅलिलिओने कदाचित सांगितलं तेव्हा जगाला हे कळलं की सूर्य



वे.मू. श्रीकांत भिकाजी चितळे यांचा सत्कार करताना श्री. अशोकराव जोशी



वे.मू. योगेश बोरकर यांचा सत्कार करताना वे.मू. माधव परांजपे



श्री. अशोकराव जोशी यांचा सत्कार करताना वे.मू. माधव परांजपे



श्री. विकासराव वालावलकर यांचा सत्कार करताना वे.मू. माधव परांजपे

स्थिर आहे आणि त्याच्या भोवती पृथ्वी फिरते पण हजारो वर्षांपूर्वी वेदात हे सांगितलेलं आहे जे आपल्या पंचांगात; आपण रोज वाचत असतो की पृथ्वी सूर्याभोवती फिरते आणि चंद्र पृथ्वीभोवती फिरतो; तेव्हा इतकं जे महाज्ञान आहे ते आपल्या समाजाला उपलब्ध होणार आहे आणि अशासाठी हे विद्यापीठ निर्माण होते आहे आणि यामुळे तक्षशिला, नालंदा किंवा विक्रमशीला किंवा वल्लवी अशा विद्यापीठांचा मोठा वारसा होता जो संपूर्णपणे आता नष्ट होत चाललाय. तो परत पुनरुज्जीवित होण्यासाठी या संस्थेचा खूप मोठा वाटा आहे. आणि त्यामुळे काकामहाराजांनी आणि वालावलकर साहेबांनी जे पाऊल उचललं आहे ते पुन्हा भारत देशाला एका सुवर्ण युगाकडे नेण्यासाठीचं हे पहिलं पाऊल आहे आणि याची सुरुवात या वेदापासून झालेली आहे आणि म्हणून आजचा जो कार्यक्रम आहे त्यासाठी जे ध्येय गुरुजींनी ठरवलं आहे त्यात यशस्वी व्हावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना. आणि या वेदांचं असंच जतन होऊन त्यातलं जे सगळं ज्ञान आहे आम्हा सर्वांपर्यंत पोहोचावं आणि त्याचं आकलन व्हावं याच दृष्टीने या विद्यापीठाची स्थापना 'श्री विठ्ठलराव जोशी विद्यापीठ' अशी करत आहोत. हा संकल्प म्हणजे सिद्धी असल्यामुळे हे यशस्वी होणारच आहे आपल्या सगळ्यांची साथ आणि आपल्या सगळ्यांची पॉझिटिव्ह एनर्जी त्यात एकत्रित झाली तर महाराज नक्कीच आपल्या सगळ्यांना यश देतील हीच स्वामीचरणी प्रार्थना.''

यानंतर वे.मू. चितळेगुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ''... उपस्थित सगळे वेदाचार्य तसेच वेदाचार्य बोरकरगुरुजी, माधव परांजपेगुरुजी, श्रीअशोककाका या सगळ्यांना अभिवादन करून मी एक-दोन शब्दात माझं मनोगत व्यक्त करणार आहे. ज्या स्थानात आपण आज बसलेलो आहोत हे स्थान दत्त महाराजांपासून आलेलं आहे. दत्तात्रेय हा अगदी अनादी अवतार आहे. ब्रह्मदेवाचे पुत्र अत्रि आणि अत्रि ऋषींचा पुत्र दत्तात्रेय. ही परंपरा कशी आहे तर ज्ञानाची परंपरा आहे. दत्तात्रेयांनंतर त्यांनी कृत युग, त्रेतायुग, द्वापार युग, आणि कलियुगातसुद्धा स्वतः संचार करून ज्ञान प्रदान केलं. अनेक परमेश्वराचे अवतार झालेले आहेत. आपल्याला माहिती आहे त्या अवताराचं कार्य हेही माहिती आहे. गीतेमध्ये त्याचा उलगडा केलेला आहे की दुष्टांचा संहार व्हावा आणि सज्जनांचे रक्षण व्हावं यासाठी परमेश्वराचे आत्तापर्यंत अवतार झाले आहेत हे अवतार उदंड झाले. पण ते लयाला गेले. त्यांचं कार्य झाल्यानंतर ते संपले. पण एक अवतार असा होता की त्या अवताराला कुठलाही नाश नाही. तर हा आहे दत्त अवतार. हा अवतार होण्यासाठीसुद्धा भगवंताला त्रिमूर्ती येऊन त्यांना साहाय्य होऊन त्या अत्रिऋषी आणि अनसुया यांच्या पोटी त्यांचा मानसजन्म झालेला आहे. दत्तात्रेयांनंतर कलियुगात नृसिंहसरस्वती महाराजांच्या रूपाने ते प्रकटले. आधी ते श्रीपादश्रीवल्लभ या नावाने प्रकटले आणि त्यानंतर स्वामी समर्थ, त्यानंतर बीडकरमहाराज, त्यानंतर बाबामहाराज तथा वासुदेवानंतसरस्वती आणि त्यानंतर श्रीसदुरु दिगंबरदासमहाराज आणि आता ही सगळी ज्ञानाची धुरा अशोककाकांच्या खांद्यावर टाकलेली आहे. त्या प्रकारे त्यांचं हे कार्य चालू आहे. या सहस्रबुद्धे समाधिमंदिराचं एक वैशिष्ट्य आहे. येथे कर्म आहे, उपासना आहे आणि ज्ञान पण आहे आणि विशेष म्हणजे ब्राह्मणत्वाचं संरक्षण करण्याचं काम इथं चालू आहे. अनेक याग, अनुष्ठानं इथे होत आहे. अनुष्ठानात वेद पारायण आहे. पाठशाळा आहे. अनेक तऱ्हेची कार्यं इथे चाललेली आहेत. मला असं वाटतं अशा तऱ्हेची इथली ही शिस्त, इथला वक्तशीरपणा, स्वच्छता महाराष्ट्रामध्ये काय, भारतामध्येही कुठे आढळणार नाही. कुठेही नाही! १९७८ ते १९९८ ही वीस वर्षं मी इथल्या अनुष्ठानात सहभागी होतो. मला वेदमूर्ती लक्ष्मणशास्त्री सप्रे त्यांनी इथे प्रवृत्त केलं आणि मला इथलं एक त्यांच्या हाताखालचं काम म्हणून निरीक्षणाचार्य म्हणून एक सुपारी मला दिगंबरदासमहाराजांनी दिलेली आहे. तो काळ मला आठवतोय. आणखी इथलं एक वैशिष्ट्य असं आहे की पुरुषांचं मर्यादेत वागणं आणि स्त्रियांचं मर्यादाशील वागणं हे इथं शिकवलं जातं ते कुठेही शिकवलं जात नाही. आणि



डॉ. सुवर्णा पाटील यांचा सत्कार करताना वे.मू. माधव परांजपे




डॉ. सुवर्णा पाटील नियोजित श्री विठ्ठलराव जोशी विद्यापीठाविषयी माहिती देताना

या सर्वांवर महाराजांचे अतिशय लक्ष आहे. आपल्या ऋग्वेदात म्हटलं आहे की जी स्त्री मर्यादेत राहते, मर्यादाशील राहते, जो पुरुष मर्यादेत राहतो असे स्त्री पुरुष आणि विशेषतः स्त्रिया या आपोआप ब्रह्मपदाला पोहोचतात. त्यांना काहीही करावं लागत नाही. ह्या सगळ्याचं वैशिष्ट्य मला इथे आढळतं. ९८ सालापर्यंत मी इथे होतो. नंतर मात्र मला इथे येता आलं नाही. आता मात्र इथल्या वास्तूत खूप बदल झालेले आहेत. खूपच फरक पडलेला आहे ही एक चांगली गोष्ट आहे. बाबामहाराजांचं इथे अस्तित्व आहे हे लक्षात ठेवा. देहातीत रूपाने म्हणजे त्यांच्या जीवनकार्यातसुद्धा ते देहातीतच वागत होते. फक्त ते इथे स्थूल शरीराने काही कार्य करता येत नाही एवढं कार्य ते सूक्ष्म रूपाने इथे करतात, करत आहेत हे वैशिष्ट्य आहे. श्रीकृष्ण जोपर्यंत होते तोपर्यंत दुर्योधनाला ते वळवू शकले नाहीत. जेव्हा सूक्ष्मरूपाने एखादे अवतारी पुरुष कार्य करतात ते अनेक गोष्टी घडवून आणतात. ते निमित्त कोणालातरी करतात. ते घडवून आणतात. त्याचं हे फळ आज आपल्याला इथे दिसतंय. वेदांचं महत्त्व आपल्याला माहितीच असेल. वेद जर रक्षण झाले आणि त्याचबरोबर जर त्याचा वैदिक रक्षिला गेला तरच हा वैदिक धर्म राहील; अन्यथा नाही. इतकं त्या वेदाचे महत्त्व आहे. ऋग्वेदाचं इथे घन पारायण आहे. माउलींनी वैदिकांचे वर्णन केलेलं आहे, ''ऋग्वेदादि तिन्ही। प्रतिष्ठीजति वाग्भुवनीं । केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा ।।'' आपल्या वाणीमध्ये, त्या भुवनामध्ये ज्यांनी त्या वेदाला प्रतिष्ठित केलेलं आहे असा त्यांचा अधिकार मोठा आहे. या वाग्भुवनात त्यांनी ब्रह्माची स्थापना केली आहे. वेद म्हणजे ब्रह्म. वेदाचे महत्त्व किती सांगावं? त्याबद्दल आपण आता काही बोलणार नाही कारण आपण सगळे इथे ज्ञानी आहात. घनाचं काठिण्य किती आहे हे वैदिकांना माहिती आहे. घनाचे जे वैशिष्ट्य आहे, घन अत्रीऋषींनी प्रारंभित केला आहे. जिथून आपली ही दत्त अवताराची परंपरा सुरू झाली त्या अत्रिऋषींनी ही घन विकृती तयार केली आहे. या घन विकृतीत १०५५२ मंत्र, सव्वा ते दीड लाखाच्या वर पदं! वेद सोडून जेवढे जेवढे मोठे ग्रंथ आहेत त्याच्यात काहीतरी पाठ भेद आहेत. ज्ञानेश्वरीला प्रारंभ करतानासुद्धा 'सकलार्थ' मती प्रकाशु की 'सकल' मती प्रकाशु? लगेच पाठभेद करायला सुरुवात झाली! ह्याला पाठभेद नाही हे वैशिष्ट्य आहे. उद्या कर्तुम्अकर्तुम सामर्थ्यवान भगवंत जरी प्रकट झाला आणि तो म्हणाला, 'अग्नी' शब्दाला आपण पर्याय करू 'वन्ही'! नाही चालणार! करूच शकणार नाही तो! इतकं त्याचं वैशिष्ट्य आहे! 'अग्निमीळे' आहे ते 'वन्हीमीळे' नाही चालणार, ते अनुकूल्य आहे आणि आपल्या वैदिकांनी अनादी कालापासून ही परंपरा चालू ठेवलेली आहे. आपल्याला त्याचं महत्त्वं कळत नाही. पण घनपाठी होणं सोपं नाहीये! फार अवघड आहे! अतिशय फार मोठी बुद्धी! बुद्धी सामान्य शब्द आहे पण त्यात धारणा ही महत्त्वाची आहे ही धारणा जर उत्तम असेल तर तो वैदिक होऊ शकतो. त्याला श्रम अतिशय आहेत. त्या मंत्राचे जे मंत्रत्व आहे, ध्वनीप्रधान आहे. आणि ते ध्वनीप्रधान असल्यामुळे ते कार्य करू शकतात.

आपलं संपूर्ण जग हे ध्वनीप्रधानच आहे. ध्वनी जर वजा केला तर त्या वेदाला, या सृष्टीला काही अर्थ राहणार नाही. तो मंत्रोच्चार होतो या मंत्रोच्चाराने वेदकाची स्थिती होते. मंत्राच्या चिंतनाने वेदकाचा निरय होतो असा त्या दोन्हीत फरक आहे म्हणून मंत्रध्वनी उच्चार हा अतिशय महत्त्वाचा आहे. मला अशी गंमत वाटते की मंत्र झाला, पण पदाने अर्थ स्पष्ट होतो. मंत्रपदाला आधी ध्वनी, नंतर नाद, नंतर स्वर आहेत आणि त्याप्रमाणे या पदांनी त्याचा अर्थ स्पष्ट झाला पण संहितेचा आता थोडा दोष निर्माण झालेला आहे. म्हणून त्या पदातून क्रमविकृती तयार होते. क्रमानंतर जटा होते. जटानंतर घन तयार होतो.

हे सगळं काही विशेष सांगण्याची आवश्यकता नाहीये. आपण इथे सगळे ज्ञानी आहात. या संस्थेने, महाराजांच्या मंदिराने अनेक वैदिक तयार केले आहेत. आतापर्यंत मी इथे ऐकलेलं आहे की जवळजवळ ५० विद्यार्थी इथे तयार झालेले आहेत. केवढं मोठं आश्चर्य आहे. असं वाटते की आज मंदार क्षीरसागर याने इथे घनाचा पारायण केलेलं आहे. त्याला अनुमोदन दिलेलं आहे आणि माधव



*वे.मू. श्रीकांत भिकाजी चितळे – ''.. जी स्त्री मर्यादेत राहते, मर्यादाशील राहते; जो पुरुष मर्यादेत राहतो, असे स्त्री पुरुष आणि विशेषतः स्त्रिया या आपोआप ब्रह्मपदाला पोहोचतात.''*

परांजपेंसारखे गुरुजी इथे प्राप्त झालेले आहेत. 'परांजपे' शब्दाची व्याख्या जर आपण बघितली तर 'परे'चा जप करणारा तो परांजपे. परा वाणीचा जप करणारे, मग 'परे'तून पश्यंतीत आले. पश्यंतीतून ते मध्यमात आले. आणि वैखरीतून वेद बाहेर आले. आपण जे वेदमंत्र म्हणतो याच्यामागे केवढी शक्ती असते.

इतक्या तऱ्हेने तो प्रवास होतो. आत्मा बुद्धीशी संबंधित होतो. मनाशी संबंधित होतो. त्यानंतर काया आणि अग्नीशी संबंधित होतो. वायूशी संबंधित होतो आणि परेला स्फुरण देतो आणि परेतून तो पश्यंतीत येतो. परेचे स्थान हे नाभी. पश्यंती हृदयात आहे. आणि मध्यमा कंठात आहे. वैखरी मुखातून बाहेर पडते. इतका प्रवास करून तो वेदमंत्र येतो. तेव्हा संपूर्ण 'उत्पत्ती स्थिती लया'चं कारण हा सगळा वेदमंत्राचा नाद आहे हे लक्षात ठेवा. अशा तऱ्हेचं हे फार मोठं कार्य इथं चालू आहे. त्यांचे निरीक्षक म्हणून योगेश बोरकरगुरुजी इथे आलेले आहेत. हे सगळे घनपाठी आहेत. योगेशचं मला कौतुक वाटतं की त्याने दोन पारायणं केली आहेत घनामध्ये! एक अंधेरीला केलं आणि एक आळंदीला केलं आहे! हा मोठा योग आहे, नुसता योग नाही, योगेश आहे! आणि त्यानंतर मला आठवण होते फडकेगुरुजींची. वेदमूर्ती वसंत फडके यांनी आळंदीची शाळा सुरू केली आणि असेच अनेक घनपाठी निर्माण केले आत्तापर्यंत आळंदीला! आम्ही त्याला 'देवाची' म्हणत होतो, आता आळंदी 'वेदाची' झालेली आहे! आणि अशा तऱ्हेने फडकेगुरुजींनी फार मोठं योगदान केलेलं आहे. आणि म्हणून आज नृसिंहसरस्वती पाठशाळेसारखी पाठशाळा कुठे असेल असं मला वाटत नाही. असेल एखादी अपवादात्मक, पण अतिशय दक्षतेने, टांकसाळीतून नाणी निघावीत, नोटा निघाव्यात असे हे घनपाठी तयार झालेले आहेत या कार्यासाठी हे विशेष आहे!

ह्या कार्यासाठी वेळ आहे आणि त्या वेळेतच मला सर्व बसवायचं आहे. वक्तशीरपणा हा महत्त्वाचा आहे इथला. याची जाणीव मला पहिल्यापासून आहे. कारण दिगंबरदासमहाराजांपासून मी इथं हा सगळा अनुभव घेतलेला आहे. घड्याळ्याच्या काट्यावर आहे. आत्तासुद्धा आम्ही बाहेर निघताना अशोककाका म्हणाले, ''अजून दोन मिनिटं जायला लागतील आपल्याला तेव्हा आपण निघू!'' मला आठवण झाली आणि शिस्त ही पाहिजेच हो! त्याशिवाय कुठलंही कार्य व्यवस्थित होत नाही.

अशा तऱ्हेने आज इथे दोन शब्द बोलायला सांगितले. माझी योग्यता आहे असे मी समजत नाहीये. मी साधा क्रमाच्या मांडवाखालून गेलेला वेदोपासक आहे. वेद उपासक मात्र नक्की आहे आणि आमचे गुरुजी नेहमी म्हणत असत, ''अरे किती पाठ येतो हा दुय्यम भाग आहे, पण वेदाची उपासना करा. ऋग्वेदात हे सगळे प्रकार दिलेले आहेत आणि आपण त्याचं आचरण करून त्याची अनुष्ठानं केली तर कार्य होतं! पण नाही झालं तर ते तुमचं प्रारब्ध आहे! पण प्रारब्धालासुद्धा धक्का देता येतो. क्षीण प्रारब्धाला धक्का देता येतो. तीव्र प्रारब्ध काही प्रमाणात क्षीण होतं. थोडंसं आपल्याला भोगावं लागतं ती गोष्ट सोडून द्या. सर्वांना एकदा धन्यवाद देतो. एकदा अभिवादन करतो आणि माझ्या वाणीला मी इथे विराम देतो. गुरुदेव दत्त गुरुदेव दत्त.''

या घनपरायणासाठी श्रोते म्हणून लाभलल्या वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी यांचा सूत्रसंचालकांनी परिचय करून दिला. 'पारायणकर्त्या विद्यार्थ्याला आपण केलेल्या विद्येचे प्रकटीकरण करण्यासाठी योग्य क्षमतेचा श्रोता असावा लागतो आणि सर्व ठिकाणच्या पारायणाचा श्रोता म्हणून वेद चुडामणी योगेश्वर बोरकरगुरुजी यांच्या नावाला विद्यार्थ्यांची प्रथम पसंती असते. कारणेही तशीच आहेत! वे.मू. योगेशगुरुजी अत्यंत सजग आहेत. मृदुभाषी आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकांची योग्य रितीने समजून सांगतात; त्यामुळे ते वेदविद्यार्थ्यांना अत्यंत प्रिय आहेत. मूळचे गोव्याचे असलेले बोरकरगुरुजी यांनी आळंदी येथील श्रीनृसिंहसरस्वती पाठशाळेत वे.मू. वसंत फडके, वे.मू. पुरुषोत्तम उपाध्ये आणि वे.मू. सितारामभट्ट आठल्येगुरुजी यांच्याकडे सदशग्रंथ घनांत ऋग्वेदाचे अध्ययन केले. जटा



*श्रवणकर्ते वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी यांचे पूजन करताना पारायणकर्ते वे.मू. मंदार मधुकर क्षीरसागर, सोबत डावीकडून वे.मू. मंदार फडके, श्री. बापूसाहेब इनामदार आणि वे.मू. माधव परांजपे*

व घन यांचे अध्ययन वैदिकमुर्धन्य कै. विनायकभट्ट आठल्ये यांच्याकडे रत्नागिरी येथे झाले. वेदचुडामणी, समर्थवेदवारिधि आदी पदव्यांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना ‘धर्मश्री’ या पदवीने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. संपूर्ण देशातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी त्यांनी आपल्या अध्ययनाला मान्यता मिळवली आहे. अनेक घनपारायणातही त्यांचे नेतृत्व अथवा सहभाग असतो.

यानंतर परंपरेप्रमाणे छात्र पारायणकर्ते वे.मू. मंदार मधुकर क्षीरसागर यांनी पारायणाचे श्रोते वे.मू. बोरकरगुरुजी यांचे आणि श्रीदेवी सरस्वतीचे पूजन केले. पारायणकर्ते आसनस्थ झाल्यावर वे.मू. निगुडकरगुरुजी यांनी पारायणकर्त्यांचा परिचय करून दिला. धामणी (आंबेगाव-पुणे) येथे वे.मू. मंदार क्षीरसागर यांचा १३/०२/१९९७ रोजी जन्म झाला. त्यांनी वे.मू. माधव परांजपे यांच्याकडे १४ वर्षांत ऋग्वेद सदशग्रंथ घनांत अध्ययन पूर्ण केले. दक्षिणाम्नय शारदापीठम् - शृंगेरी, श्रीसहस्रबुद्धे समाधिमंदिर - पुणे, वेदशास्त्रोत्तेजक सभा - पुणे, अवधूतपीठम् - मैसूर, कांची कामकोटी पीठम् - कांचिपुरम् आदी ठिकाणी अनेक परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण. त्यांनी नुकतेच श्रीसहस्रबुद्धे समाधिमंदिरात मुखोद्गत जटापारायण केले, शिवाय अनेक पारायणात आणि सभा संमेलनात सहभाग घेतला आहे.

यानंतर पारायणाला प्रारंभ झाला. हे पारायण मिती श्रावण शुद्ध पंचमी, शक १९४७; मंगळवार, दि. २९ जुलै २०२५पर्यंत दररोज सकाळी ७.०० ते १२.०० या वेळेत होणार असून वेदप्रेमी, श्रद्धाळू श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रवणाचा लाभ घेऊ शकतात.



*श्रवणकर्ते वे.मू. योगेश्वर बोरकरगुरुजी आणि पारायणकर्ते वे.मू. मंदार मधुकर क्षीरसागर,*



*उपस्थित प्रेक्षक*



*उपस्थित भगिनीवर्ग*



*पारायणकर्ते वे.मू. मंदार मधुकर क्षीरसागर*
*‘ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातमम् ।।’*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# डेरवण येथे MDR TB आजारावरील नवीन उपचार पद्धती सुरू



*BPaLM² या नवीन उपचार पद्धतीचा अवलंब केलेल्या पहिल्या रुग्णासमवेत पल्मोनोलॉजिस्ट डॉ. अमेय परांजपे आणि रुग्णालय कर्मचारी*

दि. ३ जून २०२५ रोजी भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय तसेच ग्रामीण रुग्णालय, सावर्डे येथील DR TB केंद्रामध्ये MDR TB आजारावरील BPaLM² ही नवीन उपचार पद्धती (drug regimen) सुरू करण्यात येत आहे. MDR TB आजारावरील ही नवीन उपचार पद्धती रुग्णांसाठी अतिशय सोप्या स्वरूपाची आहे. पूर्वीच्या काळी MDR TB ह्या आजाराचे निदान झाल्यावर रुग्णांना कमीत कमी २ वर्षे औषधे घ्यावी लागत असत. ह्यामध्ये सुरुवातीचे ६ महिने इंजेक्शन घेणे अनिवार्य होते, ज्यामुळे विविध प्रकारच्या दुष्परिणामांना रुग्णांना तोंड द्यावे लागायचे. तसेच २ वर्षे इतका प्रदीर्घ काळ गोळ्या घ्याव्या लागत असत. त्यामुळे अनेक रुग्ण औषधोपचार अर्धवट सोडून देत असत. वरील नवीन उपचार पद्धतीमध्ये कोणत्याही इंजेक्शनचा सामावेश नसून ती फक्त ६-९ महिने इतक्याच कालावधी पुरती मर्यादित आहे. त्यामुळे साहजिकच सर्व रुग्णांना MDR TB ह्या दुर्धर आजारापासून लवकरात लवकर बरे करण्यासाठी ह्या उपचार पद्धतीचा निश्चितच उपयोग होईल.

वालावलकर रुग्णालयात DR TB केंद्राची सुरुवात कोविड काळात करण्यात आली. मागील ५ वर्षांत रत्नागिरी जिल्ह्यातील शेकडो MDR TB रुग्णांना मोफत उपचार पद्धतीचा लाभ ह्यामुळे घेता आला आहे. हे DR TB केंद्र public private partenership ह्या मॉडेल खाली चालू करण्यात आले असून District TB Center, जिल्हा रुग्णालय रत्नागिरी ह्याच्याशी संलग्न आहे. नव्याने सुरू होणारी BPaLM² ही उपचार पद्धतीदेखील मोफत स्वरूपात उपलब्ध असणार आहे व त्यासाठी रुग्णांना कमीत कमी १ आठवडा रुग्णालयात भरती होणे अनिवार्य असेल.

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035